RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक ५४] शुक्रवार, ऑगस्ट ३०, २०१३/भाद्र ८, शके १९३५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २५.००

**असाधारण क्रमांक ११२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधी व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २७ ऑगस्ट २०१३.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक इएसटी. २०१२/प्र.क्र. ३८६/का. दोन.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सहसचिव (विधी), गट अ या पदाच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना विधी व न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सहसचिव (विधी), गट अ (सेवाप्रवेश) नियम, २०१३ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " विभाग " म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याद्वारे तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र शासन कार्य नियमावलीतील पहिल्या अनुसूचीत नमूद केलेला विभाग ;

(ब) " उप सचिव (विधी) " म्हणजे शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील उप सचिव (विधी) ;

(क) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ड) " सहसचिव (विधी) " म्हणजे शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सहसचिव (विधी).

३. सहसचिव (विधी) या पदावरील नियुक्ती, उप सचिव (विधी) हे पद धारण केलेल्या व या पदावर तीन वर्षांहून कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून गुणवत्ता-नि-ज्येष्ठता या आधारावर काटेकोरपणे निवड करून सुयोग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, विधी व न्याय विभागाच्या नागपूर, औरंगाबाद येथील कार्यालयात तसेच कोणत्याही मंत्रालयीन प्रशासकीय विभागात बदली होण्यास पात्र असेल.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने या बाबतीत केलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली नसेल तर त्याला सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने संगणक हाताळणीबाबतचे वेळोवेळी विहित केलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. ल. आचलिया,**
प्रधान सचिव व विधी परामर्शी.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 27th August 2013.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. EST. 2012/C.R. 386/D-2.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating the recruitment to the post of Joint Secretary (Legal), Group 'A' under the administrative control of the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra, namely : —

1. These rules may be called the Joint Secretary (Legal), Group A under the administrative control of the Law and Judiciary Department (Recruitment), Rules, 2013.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Department" means the Department mentioned in the First Schedule of the Maharashtra Government Rules of Business made by the Governor of Maharashtra in exercise of the powers conferred by article 166 of the Constitution of India ;

(*b*) "Deputy Secretary (Legal)" means the Deputy Secretary (Legal) under the administrative control of the Law and Judiciary Department of the Government ;

(*c*) "Government" means the Government of Maharashtra ;

(*d*) "Joint Secretary (Legal)" means the Joint Secretary (Legal) under the administrative control of the Law and Judiciary Department of the Government.

3. Appointment to the post of Joint Secretary (Legal) shall be made by promotion of a suitable person strictly on the basis of merit-*cum*-seniority from amongst the persons holding the post of Deputy Secretary (Legal) having not less than three years of regular service on that post.

4. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred to the offices of the Law and Judiciary Department at Nagpur, Aurangabad or any of the Administrative Departments of Mantralaya.

5. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be required to pass the examinations in Hindi and Marathi languages according to the rules made in this behalf, unless he has already passed, or has been exmepted from passing those examinations.

6. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be required to possess a certificate in computer operation prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. L. ACHLIYA,
Principal Secretary and
Remembrancer of Legal Affairs.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.